जाक्र/ प्रपिवियो/सां-८/ म मं अधि/८५/२०१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे
दिनांक :-१५ फेब्रवारी २०१९

प्रति,

विभागीय सांख्यिक,
द्वारा, ----------------------
विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)

**विषय** :- प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप 2019 अंतर्गत पिके व विमा क्षेत्रघटक अधिसूचित करणे बाबत..

**संदर्भ** :- १. या कार्यालयाचे पत्र क्र ५१९ दिनांक २९/०९/२०१८
२. या कार्यालयाचे जाक्र ६०६ दिनांक २९/१०/२०१८
३. या कार्यालयाचे जा. क्र ७४१ दि.२७.१२.२०१८
४. राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीची बैठक दिनांक २८/०१/२०१९

राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून केंद्र शासनाची महत्वाकांक्षी प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत राज्यातील खरीप हंगामातील १५ पिके अधिसूचित करण्यात आली आहेत.सदर योजनेची अंमलबजावणी राज्यात महसूल मंडळ, महसूल मंडळ गट, तालुका स्तरावर विमा क्षेत्र घटक अधिसूचित करून करण्यात येते. या योजने अंतर्गत पिके व विमा क्षेत्र घटक अधिसूचित करण्याचे अधिकार मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीस आहेत.

संदर्भ क्र १ ते ३ अन्वये जिल्ह्यातील खरीप हंगामातील विविध पिकाखालील क्षेत्राचा महसूल मंडळ निहाय आढावा घेवुन विमा क्षेत्र घटक अधिसूचित करण्यासाठी जिल्ह्याचा परिपुर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीसह सादर करणे बाबत मार्गदर्शन करण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने जिल्हयाकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाचे अधिन राहुन नव्याने / स्वतंत्र अधिसूचित तसेच वगळावयाचे महसूल मंडळ, महसूल मंडळ गट, तालुका स्तर या बाबतचे प्रस्ताव तयार करून दि. २८.०१.२०१९

रोजी झालेल्या राज्यस्तरीय पिक विमा समन्वय समितीच्या आढावा बैठकीत मंजुरीस सादर केलेला होता. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार व दिलेल्या सुचनांप्रमाणे सदर प्रस्ताव पुन्हा सुधारित करण्यात आला आहे. त्या नुसार अंतिम केलेला जिल्हानिहाय अधिसुचित विमा क्षेत्र घटकाचा पिक निहाय प्रस्ताव सोबत जोडण्यात येत आहे. त्यानुसार आपल्या जिल्हयासाठी अधिसूचित पिके व अधिसूचित विमा क्षेत्र घटक यांची तपासणीकरून या कार्यालयास २ दिवसात कळविण्यात यावे. सदर अधिसूचित करावयाचे विमा क्षेत्र घटकाचा तपशिल कृषि विभागाच्या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सोबत वरिल प्रमाणे

कृषि संचालक ( वि.प्र. )
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत- मा. सचिव, कृषि विभाग, मंत्रालय मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी - माहिती तथा कार्यवाहीस्तव

१. मा. जिल्हाधिकारी ( सर्व )
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ( सर्व )

करण्यात